# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 06/01/2022 (गुरूवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील इंदीरा नगर कन्हान येथे दिनांक 29/12/2021 चे 18.00 वा. ते दिनांक 05/01/2022 चे 08.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– भुषन रामभाउ खानकूरे वय 52 वर्ष, रा. इंदीरा नगर कन्हान हे नागपूरला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घराचा कडी कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपाटात ठेवलेले चांदीचे व सोन्याचे दागिने एकुण किमंत कि. 17,550/–रु. चा मुददेमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मेश्राम मो. नं. 9923798688 हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील मौजा आंबोली शिवार येथे फिर्यादी नामे– चंदु गणपत झोडे वय 40 वर्ष, रा. मकरधोकडा यांची ठेकाबटाईने केलेली 6 एकर शेती मौजा आंबोली शिवारात आहे. दिनांक 03/01/2022 ते दिनांक 05/01/2022 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी यांचे शेतात अज्ञात आरोपीने सोयाबिनचे ढिगातील सोयाबिन काढुन ते ताळपत्रीवर आपटुन सोयाबिन अंदाजे 3 ते 4 क्विंटल किमती 18,000/–रु. चा मुददेमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार आंनद धात्रक मो. क्र. 9545355470 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 23 कि. मी. अंतरावरील गोंडी मोहगाव येथे दिनांक 05/11/2021 चे 17.00 वा. ते दिनांक 05/01/2022 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नरेन्द्र रामभाउ गवळी वय 61 वर्ष, रा. गोंडीमोहगाव काटोल हे मनसर येथे राहत असल्याने अधुन मधून दोन महिन्यानी गोंडी मोहगाव शेतातील घरामध्ये जाणे येणे करीत असतात. फिर्यादी हे मनसर येथुन घरी आले असता घराचे मागचे दार उघडे दिसले. त्यांनी आत मध्ये जावुन पाहिले असता आत मधले दार तुटलेले दिसले व घरामध्ये सामानाची पाहणी केली असता घरातील एक जुने वापरते सिलेंडर कि. 9,00/– रू. व एक पाणबुडी मोटार जुनी वापरती जयमहालक्ष्मी कंपनीची पंचायत समितीमधुन सबसिडीवर मिळालेली किमती 3,000/– रू. व एक जुना वापरलेला मोठा वजनकाटा वजनासहित लोखंडी किमती 2,000/– रू. व शेतीमध्ये वापरणारे लोखंडी चिल्लर सामान कि. 1,000/– रू. असा एकुण किंमत 6,900/–रु. चा मुददेमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक गौरव आगरकर मो.नं. 8421755849 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर